गृहित केल्यास आकाश तत्वापासून द्वंद्वाची मूळ उत्पत्ति आहे असें साहाजिक अनुमान निघतें.

आकाशापासून वायु, पुढे तेज, पुढे जल, पुढे पृथ्वी हीं निर्माण झालीं असल्यामुळे या द्वंद्वाचा या सर्व भूतांमधला खेळ विशेष आणि विशेष रीतीने असून पुढे वनस्पत्यादि प्राणिमात्रांत तो फारच बहारीचा दिसून येतो.

आतां आपण आपल्या शरीराचा विचार करूं या. हें आपले शरीर पंचमहाभूतांचा एक प्रचंड खेळ आहे, त्यांतला मुख्य खेळाडू आकाश हे तत्व आहे. तें आणि वायु, तेज, जल, आणि पृथ्वी हीं सर्व तत्वे इलेक्ट्रिसिटी, उष्णता, आणि रसायन, ( जीं या पंचमहाभूतांतर्गत आहेत. ) यांच्या मिलाफानें हें आपलें शरीररूपी अवर्णनीय यंत्र मागें वर्णन केलेल्या अश्वत्थरूपी वृक्षाच्या आधाराने अत्यंत आश्चर्यकारक रीतीनें काम करीत आहे.

ही झाली साधारण मनुष्याची गोष्ट. पण ज्यांनीं ज्यांनीं भक्तीनें, ज्ञानानें, कर्माने अथवा योगाने या अश्वत्थरूपि वृक्षामार्फत आपल्या शरीराचा खरा स्वामी जो अंतर्यामिन् परमेश्वर त्याच्या प्राप्तीसाठीं यत्न केला आणि करीत आहेत, त्यांना त्यांना आपल्यामध्यें चाललेला हा पंचमहाभूतांच्या खेळाचा सूक्ष्म अनुभव आपण होऊन प्राप्त झाला आहे, होतोही, आणि होईलही.

आकाशतत्वाचें आकलन होतांना साधकाला सूक्ष्म ध्वनि ऐकूं येणें अथवा दूरचे दिसणें ही स्थिति साहजिक प्राप्त होते. मग जसजसा त्याचा अभ्यास दृढ होत जातो तसतसें त्याला बसल्या जागेवरून दूरचें दिसणे, पाहाणें व ऐकणे या सिद्धि प्राप्त होतात.

या उपरांत पूर्णावस्थेंत म्हणजे सिद्ध झाल्यावर अणिमा, गरिमादि अष्ट सिद्धि त्याच्या दासी बनतात. या भाकडकथा नाहींत. हे प्रत्यक्ष अनुभवाचे शास्त्र आहे. म्हणून निराश न होता आणि त्यांत कांहीं नाहीं अशी

मनाची खोटी समजूत न करितां, आपल्या सर्वांच्या शरीरांत ही जी अतर्क्य शक्ति आहे तिचा जिज्ञासूंनीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहावा.

श्री साईबाबांच्या पायांपाशीं बसण्याचा ज्यांना लाभ झाला, त्यांना याविषयीं अनेक प्रकारचे अनेक अनुभव आले. आहेत.

ऐंशी वर्षांपूर्वी तारेनें हजारों कोसांवर समाचार पाठविता येईल असें कोणीं भाकीत केलें असते तर त्याला स्वप्नसृष्टींत वावरणारा असे मानण्यांत आले असतें. वीस वर्षांपूर्वी बिनतारेने पाहिजे तेथे पाहिजे त्या वेळीं संदेश पाठविता येईल असे बोलणारास वृथा वल्गना करणाऱ्याच्या कोटींत बसविण्यांत आले असते. योग्याना दूरचे दिसतें व ऐकू येते या भाकड-कथा आहेत असे साहजिक वाटत होतें.

आतां ज्यानीं ज्यांनीं ईश्वर अथवा आकाश या तत्वांचा थोडा फार सूक्ष्म विचार केला आहे, आणि तसा विचार करतांना आपल्या शरीरांतर्गत असलेल्या अश्वत्थवृक्षाच्या खेळाचा थोडा फार सूक्ष्म रीतीनें अनुभव घेतला आहे त्यांना दूरचे दिसणे अथवा ऐकूं येणे याविषयीं साहजिक आल्हाद-कारक खुलासा होऊन त्यांनीं आपल्या अंतर्गत सामर्थ्याची जाणीव जनतेला दिली, देतात, व देत राहतील. हेतु हा कीं, जनतेने उत्साही होऊन आपला स्वतःचा आत्मविश्वास जागृत करावा.

प्रीतियुक्त अंतःकरणानें प्रतिमारूपि आपल्या इष्ट मूर्तीवर विश्वास ठेवून आपली प्रगति वाढविणाऱ्या कोणत्याही स्त्रीपुरुषाचा धिक्कार करून त्याची गति खोटी आहे व माझेच खरे असा अहंकार मिथ्या आहे. अशा विचाराच्या मनुष्याची अध्यात्मिक प्रगति कधींही व्हावयाची नाहीं.

मूर्तीवर विश्वास नसेल आणि निराकार प्रभूची प्राप्ती प्रार्थनेच्या जोरावर होणार आहे असा ज्याचा आत्मविश्वास असेल, त्यानें त्याप्रमाणें जरूर करावे. हें करण्यांत देखील परमेश्वरावर अत्यंत प्रीति म्हणजे भक्ति पाहिजे. अशा मनुष्याला दांभिकपणा अत्यंत घातुक आहे.

परमेश्वर वगैरे कांहीं नाहीं, आम्ही जनतेची सेवा करणार, दुसरे आम्हांला कर्तव्य नाहीं असे ज्यांना मनापासून आत्मविश्वासपूर्वक वाटत असेल, त्यांनीं तसें जरूर आचरण ठेवावे. परमेश्वराचें अस्तित्व न मानतांही, जनताजनार्दनरूपि परमेश्वराची सेवा अशाच्या हातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीने होत आली आहे आणि होणार. तरी पण त्यांच्या स्वतःच्या मनाचे समाधान होणार नाहीं. ते व्हावयाला ईश्वराच्या अस्तित्वाचा त्यांच्या हृदयांत दृढ पाठिंबा असला पाहिजे.

"म्हातारा"

# मातृषोडशी

## श्री दत्तचित्साइसद्गुरुभ्योनमः

सप्रेम सा. न. वि. वि. खालील मजकुरास कृपेने आपल्या विबुधमान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकीं स्थान द्यावे अशी नम्र प्रार्थना आहे.

याच वर्षाच्या १—२ या जोड अंकात मी जी माझ्या मातृगया यात्रेसंबंधीं हकीकत दिली आहे त्यांत बिंदु सरोवरावर जे मातृश्राद्ध केले जाते त्या वेळीं मातेने पुत्रगर्भ धारण केल्यापासून तों तिच्या उदरांतून बाहेर येऊन त्याला चांगले समजुं लागेपर्यंत त्याच्याकरतां तिने जे कष्ट सोसले व त्याचे निरपेक्षबुद्धीनें उदरांत व बाहेर जे संगोपन केले त्याबद्दल कृतज्ञतापूर्वक त्या त्या विवक्षित प्रसंगाचे स्मरण करून प्रत्येक प्रसंगाबद्दल एकेक श्लोक म्हणून प्रत्येक श्लोकाबरोबर एकेक पिंड याप्रमाणे १६ पिंड द्यावे लागतात, असे लिहिले आहे. प्राची सरस्वती स्नान तीर्थोपवास, क्षौर व तीर्थश्राद्ध केल्यानंतर हे मातृगयाश्राद्ध शेवटीं बिंदुसरोवरावर करावयाचें असतें. अर्थातच हे श्राद्ध झाले म्हणजे प्रत्येक यात्रेकरू आपले चंबूगवाळे आटपून आपले घरीं परत जाण्याच्या गडबडींत असतो. त्यामुळें इच्छा असली तरी ह्या १६ श्लोकांत काय लिहिले आहे याची विचारपूस करण्यास त्यास वेळ मिळत नाहीं. आम्ही ४—५ दिवसांचे अवधींत नित्यक्रमिक कार्ये करून

साधारण इतर माहिती मिळविली. परंतु हे श्लोक शेवटचेच दिवशीं उशीरा श्राद्धकालीं कर्णपथावर आले असल्यामुळे त्याच्या अर्थाचा विचार करण्याचे कामीं आम्हाला ही घाईच झाली. व त्यामुळे तेथल्या तेथे श्लोक उतरून घेण्यासही संधी मिळाली नाहीं. म्हणून नंतर कांहीं दिवसानीं वे. मू. रा. पुरुषोत्तम वासुदेव करंदीकर भटजीकडून हे १६ श्लोक आम्ही मुद्दाम आणवून वाचून पाहिले. तों ते फारच अशुद्ध असून त्यांचा नीट अर्थ लागणें मुष्कीलीचे आहे असें आढळून आलें.

हे श्लोक कोणी व केव्हां केले व त्यांना शास्त्रांत अगर पुराणांत कोठें आधार आहे कीं काय हे त्या श्लोकावरून कांहींच कळत नाहीं.

मूळचे श्लोक शुद्धच असले पाहिजेत. व ते कोणी तरी संस्कृतज्ञ विद्वानानें केले असले पाहिजेत. परंतु ज्यांच्या वाणीला संस्कृताचा गंध नाहीं अशा लोकांच्या मुखपरंपरेतून ते हल्लीं म्हटले जात असल्याकारणाने त्यांत अक्षम्य अशुद्धे भरून राहिली आहेत. वृत्तभंग न करतां व मुळेंचाच अर्थ कायम ठेवून अशुद्धे कशी काढिता येतील या विचारांत असतां माझे स्नेही सरस्वतीभूषण व मीमांसाशास्त्र शिरोमणि वे. मू. रा. रा. वामन रामचंद्र शास्त्री किंजवडेकर हे मजकडे कांहीं कामाकरतां आले. मी त्यांना हे श्लोक दाखविले. त्यांनीं कृपेने श्रमपूर्वक ते शुद्ध करून त्यावर संस्कृतात टिपण्या देऊन व त्यासंबंधीं त्यांना असलेली माहिती त्यांच्या अस्खलित सुंदर शास्त्रीय गीर्वाण भाषेत लिहून मजला दिली आहे. ती माहिती व ते श्लोक मी प्रिय, विद्वान् व श्रद्धाळू वाचकांकरिता या सोबत आपणाकडे पाठवीत आहे.

या श्लोकांवरून पित्यापेक्षां मातेचा अधिकार खचितच सहस्रपटीने जास्त आहे असे दिसून येईल. माता ज्याप्रमाणे पुत्रगर्भधारणेपासून त्या गर्भाचा व पुत्रजन्मानंतर त्यास चागलें समजूं लागेपर्यंत, मग तो लंगडा असो, पांगळा असो, अंधळा असो, बहिरा असो, मुका असो, वेडा असो, व्यंग असो, अव्यंग असो, निर्बुद्ध असो, सुबुद्ध असो—जसें त्याचें

निष्काम बुद्धीनें व अकृत्रिम प्रेमाने संगोपन करते तसे पिता करीत नाहीं. पिता त्याच्या शिक्षणाची व पुढील चरितार्थाची काळजी घेतो. हे खरे पण तो कुपुत्र असेल तर घेत नाहीं. तसेच तो विद्वान असून मिळविणारा व पित्याचे आज्ञेत वागणाराही असला तरी जर तो प्रपंच्याचा भार पित्याचे माथ्यावरून आपले शिरावर घेणारा नसेल तर तो पुत्र बापास आवडत नाहीं व तो त्यावर प्रेमही करीत नाहीं. या गोष्टी कविवर्य मोरोपंत यांनीं आपल्या खालीं लिहिलेल्या केकेत स्पष्ट लिहिलेल्या आहेत.

**" पिता जर विटे, विटो, न जननी कुपुत्रीं विटे "**

**" सुविद्य, धन मेळवी वचन आयके आवरी "**

**" प्रपंचभर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरील "**

यावरून मातेच्या उपकारांत, कष्टांत व प्रेमांत व पित्याचे उपकारांत, कष्टांत व प्रेमांत किती तरी पटींचें अंतर आहे हें स्पष्ट दिसून येईल. आणि म्हणूनच मातृगया श्राद्धाच्या पिंडदानसमयीं प्रति सांवत्सरिक श्राद्धाप्रमाणे तिचे तीन पिंड करावयाचे असून शिवाय वर लिहिल्याप्रमाणें आणखी जास्त १६ पिंड करावे लागतात. पित्यास गया श्राद्धाचे वेळीं सांवत्सरिक श्राद्धाप्रमाणें फक्त तीनच पिंड देतात. त्याने पुत्रास शिक्षण दिलें व त्याच्या पुढील चरितार्थाची काळजी घेतली म्हणून त्याला ३ पिंडांपेक्षां जास्त पिंड देण्याची वहिवाट गयेस नाहीं. यावरून मातेचा अधिकार काय व पित्याचा काय हें सहज लक्षांत येईल.

आमच्या धर्म ग्रंथांतही ठिकठिकाणीं मातेचें महत्त्व फार वर्णिलें आहे. " न मातुःपरदैवतम् " हे व अशींच किती तरी मातेच्या अनुपम थोरवीचीं वचनें आहेत. भगवान् श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं आपल्या अमोल श्री ज्ञानेश्वरी ग्रंथांत तर मातेच्या अकृत्रिम व अप्रतिम प्रेमाचे आपल्या रसाळ वाणीनें रसभरीत व हृदयाला हलवून सोडणारें असें पुष्कळ ठिकाणीं वर्णन

करून मातेची अत्यंत थोरवी गाइली आहे. महाराजांनीं आपल्या श्री निवृत्तिनाथ सद्गुरुरायास व सद्गुरुकृपेस प्रत्येक ठिकाणीं " सद्गुरुमाउली, कृपामाउली" अशा प्रेमळ नांवाने अत्यादरपूर्वक संबोधिले आहे. वारकरीपंथांत " तुकाराम माउली ज्ञानेश्वर माउली" असा. साधुसंताच्या नामाचा गजर करण्याची पद्धत आहे. संकटसमयीं किंवा शारीरिक व मानसिक क्लेशसमयीं तर प्रत्येक मनुष्य " आई आई " म्हणूनच विवळत असतो. व देवाजवळ किंवा साधुसंतांजवळ कोठल्याही आपत्तीचे गाऱ्हाणे ग्यावयाचे असल्यास ते तो "हे आई, हे माय, हे माउली, हे माते, हे अंबे" अशाच शब्दप्रयोगाने देत असतो. असो. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन प्रत्येक पुत्राने खऱ्या सत्पुत्रास शोभेल असे पूर्ण कृतज्ञतेचे व अत्यंत प्रेमाचे वर्तन आपल्या मातेशीं ठेवावे.

आपणही आपल्या श्रीबाबास " साइमाउली"च म्हणतों. व तिची योग्यता तशीच अवर्णनीय आहे हे सर्वश्रुत आहे. तिच्याकडे मातेचा व पित्याचा असे दोन्ही अधिकार आहेत. तिच्या प्रेमाचा जिव्हाळा काहीं औरच आहे करितां तिच्या उपकारबद्दल व प्रेमाबद्दल आपण तिचे किती ऋणी आहों, तिजबद्दल आपण किती कृतज्ञ असलें पाहिजे, तिची सेवा आपण कयिक, वाचिक व मानसिक प्रकारें किती निस्सीम भक्तीने, किती जन्म व किती पवित्र अंतःकरणाने केली पाहिजे, व मातृगया श्राद्धाचे वेळीं स्मरणपूर्वक तिला कसा पिंड दिला पाहिजे हे प्रत्येक साईभक्तास ज्ञात नाहीं असे नाहीं. मी अल्पज्ञ त्याबद्दल जास्त काय लिहिणार !

श्री सद्गुरु साइ माउलीस तिच्या भक्त लेकरांत भेदाभेद मुळींच नाहीं. तिला तिचें लेकरूं म्हणजे लेंकरूंच. तिला ते ताम्हे नाहीं, पारेठे नाहीं, हिंदु नाहीं, यवन नाहीं, कुरूप नाहीं, सुरूप नाहीं, लहान नाहीं, मोठें नाहीं, श्रीमंत नाहीं, गरीब नाहीं, वेडे नाहीं, शहाणें नाहीं, सुबुद्ध नाहीं, निर्बुद्ध नाहीं, रोड नाहीं, लठ्ठ नाहीं, रोगी नाहीं, निरोगी नाहीं, काणत्या कां मिषानें ते

तिजकडे जावो तें प्रेमानें गेलें म्हणजे पुरे. तें तिला आवडते व त्याचें तीच संरक्षण करते.

“ **असा जरि नसे** ( सुविद्य धन मेळवी वगैरे )
**रुचे तरि न तो अभद्र क्षण पित्यास** ”
“ **तसा** ( अभद्र ) तुजचि ( सद्गुरु परमात्ममाउलीस ) **आवडे**
**करिशि तूंचि** ( सद्गुरु परमात्ममाउली ) **तद्रक्षण** ”

—**मोरोपंत केकार्ध.**

या मातृषोडशी संबंधानें आणखी कोणांस साधार शास्त्रीय किंवा पौराणिक जास्त माहिती असल्यास त्यांनीं कृपेनें श्री साइलीलेच्या पुढील एखादे अकीं ती प्रसिद्ध करावी अशी माझी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

**शार्दूल विक्रीडित.**

**अज्ञानस्वपनातुनी जननि गे बालासि या हालवी ।**
**सद्बोधामृत स्तन्य देउनि तया अंकावरी डोलवी ।**
**श्रद्धा, प्रेम, सबूरि क्रीडन तया देऊनि गे खेळवी ।**
**उद्बोधीं नच गे, करूनि इतुके पायातळीं लोळवी ॥ १ ॥**
**बालाचें नव साइमाय मन गे वेडें जसें कोंकरूं ।**
**हिंडे मोहतमीं सदा भववनीं व्योमीं जसें पांखरूं ।**
**नेमाच्या व्रजि कोंडिलें तरि पळें, त्यासी कृपा रज्जुनीं ।**
**बांधी, स्वत्पदयूपि रक्ष सदये कालवृकापासुनी ॥ २ ॥**

हे बरेंच लांबलेले मातृषोडशीवरून सुचलेलें पुरवणीलेख--सुमन त्या जगदुदरदोंदिल श्री सद्गुरुमाउलीचे पुण्यपदाब्जावर अनन्य भावानें अत्यादरपूर्वक वाहून आपली रजा घेतों.

ठाणे
ता. २१-११-२९

**बाबांचें बाळ**

---

१ झोंप. २ सबूरि=दम (धरणें) patience. ३ खेळणें. ४ जागृति. ५ रात्री. ६ नेमधर्म. ७ कोंडवाड्यांत. ८ खांबास. ९ लांडगा.

# मातृ षोडशी.

लेखकः—सरस्वतीभूषण मीमांसाशास्त्रशिरोमणी.

**वामन रामचंद्र किंजवडेकर शास्त्री.**

( संस्कृत प्रोफेसर सर परशरामभाऊ कॉलेज पुणें. )

अस्ति नामोत्तर गुर्जरप्रान्ते सिद्धपुरं महाक्षेत्रम् । यत्र हि मातुः पिण्डप्रदातमात्रेणैव मातृशरीर विशिष्टो जीवः अशरीरो भूत्वा स्वस्वरूपं जानन्नात्मानन्दमनुभवन् आस्ते । अत इदं क्षेत्रं मातृगयेति जेगीयते विबुधप्रवरैः । विलसति तत्रव बिन्दुसरो नाम मातुः षोडशपिण्डप्रदातव्यं रमणीयकं स्थलम् । तत्र हि षोडशपिण्डाः सादरं सश्रद्ध समर्प्यन्ते षोडशमन्त्रैः । मातृत्वं पुत्रत्वं हि अव्याहता जातिरिति मीमासकाः प्रतिपन्नाः। मातृशरीरावच्छिन्नो जीवः अनेकजन्मसु यस्यां कस्यां कर्मवशाद्योनौ सांसारिकं दुःखमनुभवंन्ना स्ते इति स्मर्यते[1] पुराणादिषु । कथं नु तस्य मुक्तिर्भवेदिति क्षेत्रस्थस्य जीवजातस्य चिन्ता तदनु हि तेनेदं क्षेत्रं पिण्डप्रदानप्रधानं हि सरक्षपरिपालितमस्ति । अपरमपिहि गयाक्षेत्रं जागर्ति यत्र हि भगवतो विष्णोःपदं मुमुक्षनुदिधीर्षु तिष्ठति । अस्थस्योभयस्यापि मूलं भगवा ाम्नाय एव--उभयत्रापि पिण्डप्रदान मात्रेण मोक्षमाहुः । ‘ साक्षा[2]त्कृतधर्माण ऋषयोऽवरेभ्योऽसाक्षात्कृत धर्मभ्यः उपदेशेन मन्त्रान्संप्रादुश्च ’

---

१ मृतश्चाहं पुनर्जातो जातश्चाहं पुनर्मृतः । नानायोनिसहस्राणि मयोषितानियानि वै ॥ आहारा विविधा भुक्ता' पीता नानाविधाः स्तनाः मातरो विविधा दृष्टाः पितरः सुहृदस्तथा। अवाङ्मुखः पीडयमानो जन्तुश्चैव समन्वित' । ( निरुक्ते--१४ अ. ६ खण्डे. )

२ निरुक्ते १|अ. २० ख. २.

३ निरुक्ते १२ अ. १९ ख. १.

इदं विष्णुर्विचक्रमे त्रेधा निदधे पदम् । अत्र निरुक्त ् "यदिदं किं च तद्विक्रमते विष्णुस्त्रिधा निधत्ते पदं त्रेधाभावाय पृथिव्यामन्तरिक्षे दिवीति शाकपूणिः । समारोहणे विष्णुपदे गयशिरसी[1] त्यौर्णवाभः ।

पिण्डप्रदानमात्रेणैव कथं मोक्षो भवेत्—इति नाऽऽशङ्कनीयम्, विलसति तथैवायं भगवन्महिमा । एतादृश्या क्रियाया जीवः-ज्ञानयोग्यं वपुः प्राप्यत इत्येके—अन्ये तु शरीरान्तरमप्राप्यैव मोक्षमधिगच्छतीति । वयं तु भगवतो महिमा अनन्यादृश इति मोक्षमेव विन्दतीति सत्यं ब्रूमः । यथा—सोमस्य पर्णं भूमौ पतितम् पतितस्य पलाशरूपेणाऽविर्भावात्तस्य वृक्षस्य पर्णनामसंपन्नम् । न चात्र पर्णस्य कथं वृक्षत्वे संपन्नमिति विस्मयितव्यं, विधातुरीश्वरस्याचिन्त्य शक्तित्वात् । अन्यथा बीजाद्वृक्ष इत्यत्रापि क्व बीजं क्व वृक्ष इत्यपि विस्मयः केन वार्येत ? सर्वत्र पर्णेभ्यो वृक्ष इत्ययमति प्रसंगोऽपीश्वर संकल्पाभावेन परि हर्तव्यः । स च संकल्पः कार्यैकसमाधिगम्यः तस्मादितिहासपुराणाभ्यामुपबृंहिते वेदार्थे कुतर्कैर्न चोदनीयम्—कथं पिण्डप्रदानमात्रेण मोक्ष इति । अपि नाम कथं गर्भ एव वामदेवो ज्ञानमधिगच्छेद्यदीश्वरानुग्रहो न स्यात् । तद्वदेवेदमिति विभाव्य दुस्तर्का सुविरम्यनाम् । यथा नाम आहे आम्नायस्तथैवाऽऽस्माभिः प्रतिपत्तव्यं तत्र क्वचिद्भूतार्थवादात, क्वचिद्विधे. क्वचिच्छिष्टाचारात् इति । आस्तामनया प्रासङ्गिकयाऽऽम्नायाम्नात ज्ञानधर्ममीमांसया—प्रकृतमनुसरामः । पूर्वोक्ते सरसि हि मातरमुद्दिश्यषोडशपिण्डान्समर्पयन्ति आम्नायानु गामिनः । तत्र श्रद्धालवोऽपि कलिकाल इति संशेरते तत्संशयापाकरणाय मातृषोडशीं यथामति मीमांसामहे ।

तत्र यः कश्चिदेवं चोदयेत्—का नामेयं माता यत्र हि स्वतंत्रतया पिण्डप्रदानं विदधाति, भगवत्याः फाल्गुतारे जाग्रति सुप्रसिद्धे हि गयाक्षेत्रे पिण्ड-

---

१ गयो नाम कश्चिन्महानसुरः आसीत्, स च पदा भगवता विष्णुना अधो नीत इति पुराणविदः ।

प्रदाने कृते पुनरत्र। तत्र, हि "ये चत्वामत्रानु" इत्यनेनैव मातुरपि समावेशात्। पिण्डपितृयज्ञादावपि तथैव दृष्टत्वात्। न च सूत्रकारा अपि पार्वणे[2] मातुः पिण्डदानं विदधति। तं प्रति ब्रूयात्। न वयं पितरमनुमातुरागमनं वारयामः। तथा मातुः स्वातंत्र्येणा पिण्डदानमपि न निवारयामः। अस्ति हि मातुराधिक्य संसूचिका स्मृतिः आम्नायोऽपि. "न मातुः परदैवतम्" इति स्मृतिः। आम्नायोऽपि परिशिनष्टि, पश्यतु भवान्—"त्रान्मातृतस्त्रीन् पितृतोऽस्थि स्नायुमज्जनः मातृतस्त्वङ्मांस शोणितानि मातृतोऽन्नं पानमिति"। अत्र हि पित्रपेक्षयाद्वौ गुणौ अधिकं मातृत एवाधि गच्छति पुत्रः-अन्नं पानं चेति। यद्यप्युभौ स्थूलशरीरं जनयतस्तथापि यदि माता अन्नं पानं च न दद्यात् विपद्येत पुत्रो न च मुच्येत संसारबन्धनात्। इति स्वातंत्र्येण पितुराधिक्यान्माता पिण्डानुपभुनक्तीति सुस्थम्। नन्वनया षोडश्या मुक्ताया अम्बायाः कुतः पुनः पिण्डप्रदान चोद्यते-सत्यं एकैवमाता मुक्ता स्यात्, पितर्यपि तथा—सर्वत्रैतत्त-वचोद्यम्। परं पूर्वोक्तं न स्मरसि किम्। मातृत्वं जातिः—स्यान्नामैका माता मुक्ता. अपरास्तु बन्द्धा एव सन्ति अमुक्ताः—परिशिनष्टिच भगवानाम्नायः—मातरो विविधा दृष्टाः पितरः सुहृदस्तथा। यच्च सूत्रकारमतमभ्यधायि भवता तदपि न समञ्जसम्। अन्वष्टक्यश्राद्धेहि, स्वातंत्र्येण; सत्यपि 'ये चत्वामत्रानु,' इति मन्त्रेण पितुः पिण्डप्रदाने पुनः सूत्रकारा एव मातृभ्यः पिण्डदानं विदधति. 'पितृभ्यो[1] दद्यात्स्त्रीभ्यश्च सुराचाचाममित्यधिकम्। पूर्वासु[3] पितृभ्यो दद्यादपरासु स्त्रीभ्यः' इति समाधत्स्व। सर्वत्र पिण्डत्रयं विहितं अत्र तु षोडश इति नैतदत्रचोद्यमवतरति। युग्मान् वृद्धिपूर्तेष्वित्यनेन युग्माः पिण्डा विहिताः, अपि नामैतत्तीर्थश्राद्धम्।

---

१ आ० श्रौ० सू० २ अ. ६ ख. २ आ० गृ० सू० ४ अ. ७ ख.

१ नि. १४ अ. ५ ख. २ आ. गृ. सू. २ अ. ५ ख. ४–५ सू. ३ आ. गृ. सू. २ अ. ५ ख. ७–८ सू. ४ आ. गृ. सू. २ अ. ५ ख. १३ सू.

तत्र यथावचनं कार्यम् । अस्ति नाम तत्रापि षोडशपिण्डदाने गमकमिति वक्तुं शक्यम् । षोडशावस्थाभि. पुरुषः संपद्यते । ताश्चैवम् ।

ऐकरात्रोषितं[1] हि मातृयोनौ वीर्यं कललं भवति (१)

पञ्चरात्राद् बुद्बुदाः (२)

सप्तरात्रात् पेशी (३)

द्विसप्तरात्रात् अर्बुदः (४)

पञ्चविंशतिरात्रः स्वस्थितो घनो भवति (५)

मासमात्रात् कठिनः (६)

द्विमात्रमासाभ्यन्तरे शिरः (मातुः क्लेशस्तु मासद्वयम् )(७।८)

मासत्रयेण ग्रीवाव्या देशः (९)

मासचतुष्केण त्वग्व्यादेशः (१०)

पञ्चमे मासे नखरोमव्यादेशः (११)

षष्ठ—मुखनासिकाक्षिश्रोत्रं च संभवति (१२)

सप्तमे—चलनसमर्थो भवति (१३)

अष्टमे—बुद्ध्याध्यवस्यति (१४)

नवमे—सर्वाङ्ग संपूर्णो भवति (१५)

दशमे मासे प्रजायते (१६)

एता एव षोडशावस्था षोडशमन्त्रैः शब्दान्तरैरनूद्यन्ते इति सर्वं सुस्थम् । इतरच्च सर्वं निगदेनैव व्याख्यातमिति न पुनः शब्दार्थे प्रयतामहे. इतोऽपि भगवतो अम्बा भूया वर्णयितुं शक्यते, परं तत्प्रतिपुत्र मनुभूतत्वान्नेह-

१ नि. प. १८ अ. ६ ख.

तन्यते । यया च मात्रा—प्राणादिषोडशकलानामायतनं निर्मितं किंनु नाम तस्यै षोडशपिण्ड समर्पणे नाम महत्कृत्यम् ?

## मातृषोडशी[1]

गर्भस्थे[2] गमन दुःखं[3] विषमे भूमिवर्त्मनि ।
तस्य निष्क्रयणार्थाय मातृपिण्डं ददाम्यहम् ॥ १ ॥

१ मातुः षोडशी—मातृषोडशी— मातुः मातृसंबंधिनी या षोडशी—षोडशमन्त्र, पिण्डप्रदानपद्धतिः

२ मयि पुत्रे गर्भस्थे, विषमे भूमि वर्त्मनि भूमिभागे गमने संचारे,

३ दुःखम्—एक रात्रोपितं वीर्यं यदा कललभावमापद्यते तदा भवति हि मातु. कष्टसामान्यम् । यस्मात्त्वमिदं दुःखमनुभूतवती तद्विनिमयमहं कर्तुं न शक्नोम्येव । तथापि यथाशक्ति तुभ्यं शास्त्रातिक्रमाद्भीतः सन् पिण्डं प्रदास्ये । नात्र क्रयविक्रयभावः सम्भवति । अत्र हि निष्क्रयणं नाम—यथाशक्ति अंशतः प्रत्युपकृतिरिति ज्ञेयम् ।

यावत्पुत्रो न भवति तावन्मातुश्च शोचनम्[1] ।
तस्य॰……………………………ददाम्यहम् ॥ २ ॥

१ कललबुद्बुदाद्यवस्थायां अनुभूयमानं शोचनम् ।

मासे मासे कृता कष्टं वदना प्रसावे शुचौ[1]
तस्य॰…………………ददाम्यहम् ॥ ३ ॥

१ प्रसवनिमित्ते या प्रतिमासं शुश्रूषिणी ( पेश्यवस्थायां जायमाना वेदना ) कष्टं कृता ।

**मासे मासे निषेकाद्या[1] शिशुसंतापदुःखिता[2] ॥**

**तस्य०..................................दद्राम्यहम् ॥ ४ ॥**

१ प्रतिमासंनिषेकाद्वीर्यसेकात्, रजो निर्गमनाद्वा पुत्रार्थं यः कण्डु-संतापः तेन दुःखिता.

२ शिश्वर्थं योऽर्बुदावस्थायां जायमानःसंतापस्तेनदुःखिताऽसि ।

**संपूर्णे दशमे[1] मासेऽत्यन्तमातृ[2]प्रपीडनम् ॥**

**तस्य०........................... दद्राम्यहम् ॥ ५ ॥**

१ दशमे मासि प्रजायत इति वचनात् । प्रत्यक्षमपि । पीवरः सर्वाव-यवसौन्दर्यसहितो भवतीत्यर्थः ।

२ जननावस्थाया हि अत्यन्तमेव मातुर्दुःख जायत इति सार्वजनीनम् । अत्र हि जननावस्थाया उत्कर्षः । प्रकरणं भित्त्वापि उत्कर्षापकर्षौ प्राच्य मीमांसाया दृष्टो ।

**गात्रभंगो[1] भवेन्मातुर्मृत्युरेव न संशयः ।**

**तस्य०......................... दद्राम्यहम् ॥ ६ ॥**

१ हेमातस्तव यदा हि गर्भो घनीभवति तदा शारीरस्थूल सूक्ष्मावयवाना विभजनं भवति मृत्युकालिकी वेदना जायते । यथा च शीतकाले हस्तपादौष्टाद्यवयवाः विभजनं प्राप्नुवन्ति ।

**पिबन्ती कटुमद्वाणी[1] क्वाथानि विविधानि च ।**

**तस्य०..............................दद्राम्यहम् ॥ ७ ॥**

१ कटुमती वाणी यस्याः सा । समये समये घनीभूतस्य गर्भस्य काठिन्यसंपादनार्थं, कठिनतां प्रानस्य चाशैथिल्यार्थं विविध क्वाथजातं पिबन्ती

त्वं खलु दुःखमेव प्रासवती । क्वाथं कषायादिपेयम् । कवटौषधपानेन वाणी कटुर्भवतीति सुप्रसिद्धम् । वाणी शब्देन रसनेंद्रियं गृह्यते—तात्स्थ्यात् ।

शैथिल्ये प्रसवमाप्ते माता विन्दति दुःसहाम् ।
तस्य०......................ददाम्यहम् ॥ ८ ॥

१ प्रसवविषये प्राप्ते शिरोवयवनिष्पादनेन च प्राप्ते प्रसवप्राप्ते शैथिल्ये माता दुःसहा वेदनामधिगच्छति ।

दिवा रात्रौ च या माताऽऽनन्दमेति सभर्तृका ।
तस्य०.......................ददाम्यहम् ॥ ९ ॥

१ मम ( पुत्रस्य ) सर्वगात्रप्रधानशिरोवयवप्राप्तिः संबभूवेत्यन्तरानन्दो बहिरप्यवभासते । प्रधानावयवसमुत्पादे हि उचितः सामयिक एवानन्दोद्गमः । आनन्दग्रन्थिरेकोऽयमवत्यमिति बध्यते । इत्यालंकारिका भरतानुयायिनश्च संप्रतिपन्नाः ।

अग्निवायोश्च यं देहं त्रिरात्रे पोषणेन च ।
तस्य०......................ददाम्यहम् ॥ १० ॥

१ अग्निवायूपलक्षितपञ्चभूतभ्यो मम पोषणं कृतवती त्वं नाग्निना दाहः नापि वायुना विरलभावमापादितः जननान्तरं हि तिस्रो रात्रयः अतिक्लेशमनुभवन्ती. शिरसि ग्रीवा सधाय पोषणं कृतवत्यै पिण्डं ददामि ।

पद्भ्यां जनयते पुत्रो जनन्याः परिवेधनम् ।
तस्य०.........................ददाम्यहम् ॥ ११ ॥

१ त्वग्विशिष्टपदस्ताऽनेन मातुः परिवेधनं करोति पद्भ्यां, पुत्र, इत्यनेन त्वग्न्यादेशजनितं दुःखं सूचितं भवति ॥

**अल्पाहारे कृता माता यावत्पुत्रोऽस्थिबालकः ।**

**तस्य० ..................................ददाम्यहम् ॥ १२ ॥**

१ यावत्पुत्रः कोमलास्थिकस्तावन्माताऽल्पहार करोति । येन पुत्रेण मया त्वमल्पाहारे कृता स्थापिता सोहमिदानीं पिण्डं ददामि । अनेन नखरोमव्यादेशजन्यंदुःखं ध्वन्यते । यावन्नखरोमोत्पत्तिस्तावत्कोमलास्थित्वं सुप्रसिद्धम् ॥

**क्षुधया विह्वले पुत्रे तृप्तिं माता प्रयच्छति ॥**

**तस्य०.......................ददाम्यहम् ॥ १३ ॥**

१ अनेन मुखनासिकाद्यवयवानामभिव्यक्तिं सूचयति न च मुखं विना क्षुत्संभवति ।

**रात्रौ मूत्रपुरीषाभ्यां भिद्यन्ते मातृकुक्षिकाः ॥**

**तस्य०...........................ददाम्यहम् ॥ १४ ॥**

१ अनेन चलनसमर्थत्वं ध्वन्यते. यदा हि तत्समर्थो भवति तदा कक्षिं विचालयत्येव, दिवा इतस्ततो व्यापृतमनस्का माता न जानाति तां वेदनां परं रात्रौ स्वस्थमस्काजानात्येवेति रात्रिग्रहणम् । मूत्रपुरीषाशयकुक्षिकास्थ शिरासंयोगात्कुक्षिकावेदनेत्युच्यते । कुक्षिकाभेदो भवति वेति मतिर्जायते गर्भिण्या इति स्वसंवेद्यम् ।

**यमद्वारे महाघोरे पथि मातुश्च शोचनम् ।**

**तस्य०..................................ददाम्यहम् ॥ १५ ॥**

१ अनेन बुद्ध्यध्यवसायः सूचितः या प्रज्ञा गर्भे समुत्पन्ना तस्या एवैतत्फलम् । यदध्यवसायप्रयुक्तं आम्नायाम्नातं कर्मकाण्डीयं वेदभागं प्रमाण-

मनुते, आस्तिक्यबुद्धया पारलौकिक पिण्डदानादिकर्म अनुतिष्ठति । तदेतत्सर्वं मम तदध्यवसायस्यैव फलमित्याकलनीयम्

**माता शिक्षाप्रदा नित्यं पुत्रपौत्रस्य भागिनी ।**
**अत्र पिण्डप्रदानेन पुनर्जन्मन विद्यते ॥ १६ ॥**

अनेन सर्वांगपरिपूर्णत्वं सूच्यते । न तद्विना शिक्षाप्रदानं संभवति । एवं श षोडशकश्लाघ्यवस्था एव शब्दान्तरैः संसूचयित्वा अस्मिन्सरसि समर्पितं पिण्डप्रदानं मुक्तिप्रदमिति दुदुभिध्वनिः । नापि पुनर्जन्म विद्यत इति जन्म एवात्र निषेधादस्तीत्यादि—विकाराणामभावः समर्थित एवेति जानन्तु सुधियः ।

तदिदं सामान्यतः मातृषोडशिविज्ञानं समुपहारी क्रियते मुमुक्षुभ्यः, श्रद्धालुभ्यः, विचारिभ्यश्च, सादरं सरस्वतीभूषण मीमांसाशास्त्रशिरोमणि किंजवडेकर वामन शास्त्रिणेति न्यूनातिरिक्त हंसक्षीरन्यायेन विविच्य क्षीरमेव गृहीत्वा जगन्मात्रे पिण्डप्रदानेन जीवात्मानं कृतार्थयन्तु सुधिय इति भूयसी सादरं मे विज्ञप्तिः । इति शम् )

—: इति मातृषोडशी :—

## श्री समर्थ साई सद्गुरुभ्यो नमः

सप्रेम सा. न. वि. वि.

### " मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र चिन्तयेत "

कै. गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब यांनीं, कै. अण्णा चिंचणकर यांनीं श्रीसद्गुरुराज बाबांचे पुण्यचरणकमलीं समर्पण केलेल्या स्थावर जंगम मिळकतीच्या व्यवस्थेसंबंधीं लिहिलेले प्रोसिडिंग १७ परिशिष्टासह आपलेकडे पाठवीत आहें. सदर प्रोसिडिंगावर अण्णांच्या सर्व ट्रस्टींच्या सह्या होऊन ते सर्व साईभक्तास, श्रीसाईलीला वाचकांस व शिरडी संस्थान कमेटीस कळविण्यासाठीं श्रीसाईलीलेत प्रसिद्ध करावें अशी अण्णासाहेबांची इच्छा होती. सदर प्रोसिडिंग ता. ११-७-२९ रोजीं ठाणे येथे लिहून पुरे झाले. त्याचप्रमाणे सदर मिळकतीच्या जमाखर्चाची कीर्द अण्णासाहेबांनीं प्रथमपासून लिहिली होती; परंतु प्रथम प्रथम मिळकताचा वसूल निरनिराळ्या ट्रस्टीनीं ( श्री अण्णासाहेब खरे व श्री आप्पासाहेब करंदीकर ) व सद्गृहस्थानीं ( श्री शेट नरसीलाल हरीलाल व श्री पंढरीनाथ आत्माराम ) करून त्या बद्दलच्या यादी बरेच दिवस आण्णासाहेबांकडे न आल्यामुळे व त्यांनीं वसूल केलेल्या रकमापैकीं पुष्कळशा रकमा त्यांनीं परभारें डहाणू कोर्टांत मिळकतीस असलेल्या कर्जापोटीं भरल्या असल्यामुळे त्या रकमांचे जमाखर्च त्या त्या तारखेस अण्णासाहेबाचे कीर्दीत झाले नव्हते. तरी ही उणीव राहू नये व वरील यादींतील सर्व रकमा कीर्दीत दिसतील अशी एक नवी कीर्द व खतावणी तयार करण्यास अण्णासाहेबानीं मला सांगितले. त्याप्रमाणे सिताराम त्रिंबक ऊर्फ बापूसाहेब ओक पेनशनर मामलेदार वांद्रे याच्या मदतीनें मी नवी कीर्द व खतावणी लिहून ता ११-७-२९ रोजीं पुरी केली. सदर दिवशीं अण्णासाहेबांना मी मुद्दाम ठाणें येथे माझे बिऱ्हाडीं बोलाविले होतें. त्याप्रमाणे ते दुपारीं दोन वाजतां मजकडे आले. त्या वेळीं त्याची प्रकृतीसंबंधानें कोणतीही तक्रार नव्हती. इतकेच नव्हे तर त्याची प्रकृता त्याच्या वयामानाप्रमाणे उत्तमच होती. त्यांनीं प्रोसिडिंग व कीर्द-खतावणी वाचून पाहून समाधान व्यक्त केले.

व श्री आप्पासाहेब करंदीकर हे ठाण्यास नेहमी अपिलांचे कामाकरितां येतात तरी त्यांची प्रोसिडिंगावर सही घ्या व प्रोसिडिंग मजकडे पाठवा म्हणजे मी त्यावर सही करून इतर ट्रस्टीच्या सह्या घेण्याची तजवीज करून श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध करण्यास पाठवीन असे मला सांगितले. नंतर सुमारे ६ वाजतां ते नवी कीर्द व खतावणी त्यानीं लिहिलेल्या जुन्या कीर्दीस जोडून ठेवून हीच नवी कीर्द पुढें चालू करण्याकरतां बरोबर घेऊन वांद्र्यास परत गेले.

ता. १३-७-२९ रोजीं श्री. अप्पासाहेब करंदीकर माझे बिऱ्हाडीं आले त्यांनीं सर्व प्रोसिडिंग परिशिष्टासह वाचून पाहून "प्रोसिडिंग बरोबर आहे." असा शेरा मारून त्यावर त्यांनीं आपली सही केली. नंतर अण्णासाहेबांचा व माझा जमाखर्चाच्या बाबतींत थोडा पत्रव्यवहार झाला व प्रोसिडिंग त्यांच्याकडे परत पाठविण्याच्या बेतांत मी होतों परंतु दैवाचा खेळ कांही विचित्रच असतो. आपली दैवाची इच्छा सहजांनुसार एकच जुळली तरच आपण चिंतिलेलें कार्य आपल्या इच्छेप्रमाणे हातें. नाहीं तर आपण आपल्या बुद्धीने एखाद्या कार्याची कशीही योजना केली असली तरी ते दैवाकडून आपल्या इच्छेच्या उलटच होते. त्याचप्रमाणें प्रोसिडिंगावर अण्णा साहेबांची सही होण्यापूर्वीच ता. १५-७-२९ रोजीं सायंकाळीं सुमारे ६ वाजतां वांद्र्याहून अकस्मात टेलिफोनने अण्णासाहेबांच्या देहावसानाची दुःखदवार्ता माझ्या कर्णपथावर येऊन आदळली. असो. यानंतर मध्यंतरी अण्णासाहेबांचे ऐवजी दुसरे खजिनदार वट्रस्टी नेमण्यांत बराच काल गेला त्यानंतर डहाणू चिंचणी पुणे वगैरे ठिकाणीं जाऊन बाकीच्या ट्रस्टींच्या सह्या प्रोसिडींगावर घेऊन मीही आपली सही त्यावर केली आहे. तरी सदर प्रोसिडींग सोबतच्या १७ परिशिष्टासह आपल्या विबुधमान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकांत एकदम अथवा एक दोन हप्त्यानीं सत्वर प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

ठाणें
गुरुवार ता. १० आक्टोबर
१९२९

आपला नम्र
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

## श्री साईसद्गुरुभ्यो नमः

कैलासवासी भक्तवर्य श्रीयुत दामोदर घनःशाम बाबरे
ऊर्फ अण्णा चिंचणकर यांचें मृत्युपत्र किंवा
आधुनिक संतावतंस श्री सच्चिदानंद
सद्गुरु साईबाबा शिरडी यांचे
चरणी उत्कट श्रद्धेनें अर्पण
केलेल्या स्तुत्य, उदार व
अनुकरणीय निरंतरची
गुरुदक्षणा.

कै. श्रीयुत अण्णा बाबरे राहाणार चिंचणी ता. डहाणू जि. ठाणें यांनीं श्रीसद्गुरु साईबाबा शिरडी यांना, त्यांच्याप्रीत्यर्थच निरंतर उपयोग झाला पाहिजे म्हणून आपली चिंचणी ता. डहाणू व नेवाळे व वेढें ता. माहीम येथील, मृत्युपत्राप्रमाणें, त्याचे चरणीं समर्पण केलेल्या, व त्यांनींच नेमून ठेविलेल्या ट्रस्टींनीं प्रोबेटवरून ताब्यांत घेतलेल्या व ट्रस्टींपैकीं श्रीयुत गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनीं बाकीच्या ट्रस्टींच्या संमतीनें सर्व स्थावरजंगम मिळकतीच्या आजपर्यंत केलेल्या व ते हल्लींही करीत असलेल्या व्यवस्थेबद्दलचे खुलासेवार प्रोसिडिंग.

### अण्णाचें मृत्युपत्र कागद नंबर १

अण्णानें आपले शेवटचे मृत्युपत्र विलेपारलें येथे ता. १०-७ १९१९ रोजीं केलें. या मृत्युपत्रांत कोणत्या गांवच्या जमीनीचे वार्षिक उत्पन्न किती, कोणत्या गांवचा सरकार धारा किती, आपणास कोणकोणत्या सावकारांचें किती देणें, देण्यापोटीं जमीन गहाण लावून दिली आहे कीं काय व दिली असल्यास कोणत्या सावकारास व कोणत्या गावची, याबद्दल कांहींएक उल्लेख नाहीं. फक्त मनोरलालदार यांचा ४०० रुपयांचा हप्ता दरसाल देणें आहे व बाकीचें देणें किरकोळ आहे. तसेच काहीं जमीन आपले ताब्यांत आहे व

कांहींबद्दल कोर्टांत दावे चालू आहेत, इतकेंच लिहिले आहे व कोणत्या गांवची कोणती जमीन आपले ताब्यात आहे व कोणत्या गांवच्या जमिनीबद्दल कोर्टांत दावे चालू आहेत हे कांहींच लिहिले नाहीं. यामुळे अण्णाची स्थावर जंगम मिळकत एकंदर किती किंमताची, व किती वार्षिक उत्पन्नाची, आपणांस एकंदर देणे किती व आपल्या वार्षिक उत्पन्नांतून ते देणे देण्यास किती वर्षें लागतील व सर्व कर्ज व्याजसुद्धां देऊन झाल्यावर मृत्युपत्रात, चिंचणी येथे श्री बाबांचें एक मंदीर बांधणे व बाबाच्या भक्तमंडळाचे सोईसाठीं मंदीरास जोडून एक घर बांधणे, मंदिरात बाबांची मूर्ति स्थापन करणें, तिच्या पूजेअर्चेस लागणारा खर्च करणें, वगैरे अटी पुऱ्या करण्यास त्याच उत्पन्नांतून जरूर तितका, द्रव्यसंचय करण्यास आणखी किती वर्षें लागतील व इतके करण्यास किती वर्षें, किती कष्ट व किती मेहनत करावी लागेल याची यथार्थ कल्पना ट्रस्टींना मृत्युपत्रावरून मुळींच आली नाहीं. अण्णाच्या लिहिण्यावरून ह्या सर्व गोष्टी अल्पकाळात व अल्पश्रमानें होतील अशी त्यांची समजूत झाली. परंतु ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांतून ट्रस्टीचे ताब्यांत मिळकत येऊन श्री अण्णासाहेब दाभोळकर तिची व्यवस्था पाहूं लागल्यानंतर अल्पावधींतच सक्कृत् दर्शनी मनोरलालदासच्या हुकुमनाम्याच्या रकमेवरील फक्त व्याजाचीच मिळकतीच्या उत्पन्नापेक्षां दीडपट रकमेची दुसरी दरखास्त श्रीयुत कै. काकासाहेब दीक्षित व अण्णासाहेब दाभोळकर यांजवर येऊन आदळली. अण्णासाहेबांकडे या वेळीं अण्णाचे मिळकतीचे उत्पन्नापैकीं एक पैही आली नव्हती. शिरडी संस्थानचे काही ट्रस्टी व अण्णाच्या मृत्युपत्रांत अण्णाने नेमून ठेविलेल्या ट्रस्टीपैकीं काहीं ट्रस्टी एकच असल्यामुळे, व शेवटीं ही मिळकत शिरडीसंस्थानाकडेच कायमची येण्याची सर्व शिरडीसंस्थानच्या ट्रस्टींना बळकट आशा असल्यामुळे महत्प्रयासाने दरखास्तेतील रकमेची जुळवाजुळव करून व कांहीं शिरडीसंस्थानच्या कोठीकीर्दीचे शिलकेतून उसनवार घेऊन दरखास्तीची रकम डहाणू कोर्टांत भरली. याबद्दल कच्ची हकीगत पुढे येणारच आहे. नंतर वार्षिक उत्पन्नाचा व एकंदर देण्याचा विचार करतां वार्षिक उत्पन्नाची सर्व रक्कम (धारा वजा जातां)

जरी सावकाराने दिली तरी अण्णाचें सर्व देणे फिटण्यास कमीकमी तरी ८–१० वर्षें लागतात व नंतर मृत्युपत्रातील बाबाकरतां मंदीर बांधणें वगैरे अटी पुऱ्या करण्याकरतां ६–७ हजार रुपये लागून ती रक्कम सांचविण्यास आणखी १० ११ वर्षें तरी लागतील असे नजरेस येऊन मंदीर व घर बांधण्याची अट अनावश्यक व असाध्य आहे, व मृत्युपत्रात लिहिल्याप्रमाणे इतर गोष्टी करणे म्हणजे फार श्रमाचे काम आहे व मृत्युपत्रातील एकदर अटी निष्कारण व फाजील गुंतागुंतीच्या आहेत असे काकासाहेब व अण्णासाहेब याच्या नजरेस आले.

## अण्णाचे ट्रस्टी

अण्णाने आपल्या मृत्युपत्रांत खालीं लिहिल्याप्रमाणें श्री बाबांच्या भक्तांपैकीं व अण्णाच्या नेहमीच्या परिचयाचे असे चार व अण्णाचे पहिल्यापासूनचे एक वकील मिळून पांच ट्रस्टी आपले पश्चात् आपले स्थावरजंगम मिळकतीची व्यवस्था करण्याकरितां नेमले आहेत. अण्णाचें कुटुंब अण्णाचे पूर्वी सुमारे एक वर्ष स्वर्गवासी झालें. अण्णास मूलबाळ काहीं नव्हतें.

१ कै. श्रीयुत हरी सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित बी. ए. एल्‌एल्. बी. सॉलिसिटर राहाणार विलेपार्लें मयत याचे जागीं हल्लीं श्रीयुत आत्माराम जनार्दन ऊर्फ अण्णासाहेब करंदीकर बी. ए. एल्‌एल्. बी. वकील राहाणार डहाणू.

२ रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी. ए. एल्‌एल्. बी. हायकोर्ट वकील राहाणार सांताक्रूस.

३ श्रीयुत गणेश लक्ष्मण ऊर्फ काकासाहेब महाजनी राहाणार पुणें.

४ श्रीयुत गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर पेन्शनर रेसिडेंट मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास राहाणार वांद्रें.

५ श्रीयुत अच्युत नारायण ऊर्फ अण्णासाहेब खरे, बी. ए. एल्एल्. बी वकील राहाणार डहाणू. हेच अण्णाच्या मिळकतीची माहिती असणारे व अण्णाचे बरींच वर्षे काम करणारे अण्णाचे वकील.

**( १ ) अण्णाची मृत्यु तारीख, ( २ ) स्थावरजंगम मिळकतीचा पंचनामा, ( ३ ) अण्णाचे घराची व बेड्याची स्थिति कागद नं. २.**

अण्णा हे ता.१५–४–२० रोजीं चिंचणीस वारले व ता.१६–४–२० म्हणजे दुसरे दिवशीं गांव कामगारांनीं पंचासमक्ष अण्णाच्या घरांतील जंगम मालाचा व चिंचणी, नेवाळे व वेढे येथील जमिनीच्या किंमतीचा पंचनामा केला. यात पंचानीं जंगममालाची किंमत अदमासे रु ५९०--१५ व तिन्ही गांवच्या जमीनींची किं. अजमासें रु. ६४०० केली आहे. या पंचनाम्यात अण्णाच्या चिंचणी येथील घराचा व बेडयाचा उल्लेख नाहीं. यावरून घराचा व बेडयाचा पंचनामा झाला नाहीं असे दिसते. ट्रस्टींचे ताब्यांत मिळकत आल्यावर ते जेव्हां चिंचणीस गेले तेव्हां घराचे सर्व सामान लोकानीं चोरून नेले होते. व बेडे मोडून पडले होते व त्याचेही सामान चोरीस जात होते असें नजरेस आलें. बेडे विकून टाकावे असें ट्रस्टीनीं श्रीयुत नरसीलाल शेट यांना सांगितले.

## प्रोबेट मिळण्याचा अर्ज कागद नंबर ३

अण्णाच्या मृत्यूनंतर अण्णाचे स्थावर जंगम मिळकतीची व्यवस्था ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे गेली. नंतर सुमारे १० महिन्यांनीं म्हणजे ता. २८–२–२१ रोजीं ट्रस्टींनीं मृत्युपत्रावरून प्रोबेट मिळण्याचा ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टास अर्ज केला. या अर्जांत अण्णाच्या मृत्यूची तारीख दिली आहे त्याच-प्रमाणे अण्णाचे स्थावर जंगम मिळकतीची अजमासें किं. रु. ७००० व अण्णाचे कर्जाची अदमासे रक्कम रु. ५८०० देऊन मनोरदासचे रु. ४०००, आत्माराम अनंत बाबरे यांचे १०००, काकासाहेब दीक्षित रु. ४०० व

अण्णासाहेब खरे यांचे रु. ४०० असा खुलासा त्याच अर्जांत केला आहे. परंतु दिलेले आंकडे सर्वच चुकीचे आहेत, किंवा चुकीचे नसल्यास अदमासाचे आहेत. अण्णाचे एकंदर व्याजमुद्दल सुद्धां सर्व देण्याची माहिती मी पुढें स्वतंत्रपणे याच प्रोसिडिंगांत देत आहे. म्हणून येथे आतां जास्त लिहीत नाहीं.

## १ कोर्टाकडील स्थावर मिळकतीचा पंचनामा २ प्रोबेटकरतां स्टँप

## ३ रु. १५००० चा जामीन

प्रोबेट मिळण्याचा अर्ज गेल्यावर डिस्ट्रिक्ट कोर्टानें अण्णाच्या तिन्ही गांवच्या स्थावर मिळकतीचा पंचनामा मामलतदार डहाणू व माहीम मार्फत करून आणविला या पंचनाम्याप्रमाणे वरील मिळकतीची किंमत रु. १५००० झाली. व कोर्टानें ट्रस्टीजवळ या किंमतीवर रु. ३०० चा स्टॅम्प व १५००० रुपयांचा जामीन मागितला. अण्णासाहेब दाभोळकर शिरडी संस्थानचे खजिनदार आहेत, त्या संस्थानच हिशेब ते ठेवतात व नेहमीच्या वरखर्चास लागणारी शिलक त्याचेचजवळ असते व त्याकरितां त्यांनीं एक कोठीकीर्द म्हणून ठेविली आहे. अण्णाच्या मिळकतीपैकीं अण्णासाहेब यांजकडे एक पैही आलेली नव्हती तथापि शिरडीसंस्थानच कांहीं ट्रस्टी व या मिळकतीच्या ट्रस्टींपैकीं काहीं ट्र एकच असल्यामुळें व शेवटीं ही मिळकत शिरडीसंस्थानकडेच येण्याची बळक० आशा असल्यामुळें सर्व ट्रस्टींच्या संमतीने अण्णासाहेबांनीं ही स्टँपची रक्कम कोठी कीर्दीतून ता. ४–३–२३ रोजीं उसनवार घेऊन त्याच दिवशीं ट्रस्टींचे वकील श्रीयुत शामराव कृष्णनाथ धुरंधर याजकडे पाठविली व कोठीकीर्दीत त्याप्रमाणे जमाखर्च केला. ( ता. २८-७-२३ च्या शिरडी संस्थानच्या सभेचा ठराव पहा. )

## १५००० रुपयांचा जामीन पटला.

इतक्या मोठ्या रकमेस जामीन कोण राहाणार व तो कोठून आणावयाचा याबद्दल प्रथम काकासाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर, रावबहादुर

प्रधान व देव यांच्यामध्यें ठाणे येथें देव यांच्या बिऱ्हाडीं बरीच चर्चा झाली व देव यांनीं ही तजवीज करावी असे शेवटी ठरलें. त्याप्रमाणे कुर्ला येथील सद्‌गृहस्थ व श्रीमंत व्यापारी श्रीयुत मगनलाल नथुराम देव हे देव याच्या विनंतीवरून ट्रस्टींना १५००० रुपयास जामीन राहाण्यास कबूल झाले. नंतर ठरल्या तारखेस अण्णासाहेब खरे खेरीजकरून बाकीचे ट्रस्टी देव याचे बिऱ्हाडीं ठाणें येथे आले. त्या वेळीं मगन नथूराम हेही येऊन बसले होते. नंतर पूर्वी ठरल्याप्रमाणें ट्रस्टी, मगन नथूराम याना कोर्टांत बरोबर घेऊन गेले व १५००० रुपयांचा जामीन ता. १७-१२-२३ रोजीं पटविला. परंतु त्या दिवशीं ट्रस्टींना प्रोबेट मिळाले नाहीं. ते ता. १३-१२-२३ रोजीं लिहून तयार झाले होते. पण ते ट्रस्टींचे वकीलास देण्यांत येईल असे कोर्टाकडून ट्रस्टींना सांगण्यांत आलें.

## प्रोबेट मिळालें, कागद नं. ४

वर लिहिल्याप्रमाणे जामीन पटल्यावर ट्रस्टींचे वकील श्रीयुत धुरंधर यांना कोर्टाकडून ता. २२-१२-२३ रोजीं प्रोबेट देण्यांत आले. ते त्यांनीं अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविले. हे प्रोबेट ३०० रुपयांच्या स्टँपावर लिहिलेले असून त्यास सहा रुपयाचा १ व एक रुपयाचा १ असे दोन स्टँप चिकटविले आहेत.

## ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून मिळकतीची व्यवस्था.

अण्णाचे निधनापासून ट्रस्टींचे ताब्यांत मिळकत येईपर्यंत सुमारें ४ वर्षें म्हणजे ता. १६-४-२० ते ९-४-२४ पर्यंत अण्णाची सर्व मिळकत ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टाचे ताब्यांत होती. व तेंच कोर्ट तिची व्यवस्था मामलतदार डहाणू व माहीम यांचे मार्फत पाहात असे. व कोर्टाचे नाझरसाहेब हे नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें हिशेब ठेवीत असत.

## ट्रस्टींना मिळकतीचा ताबा व कोर्टाकडील हिशोबाचें टिपण कागद नं. ५ कागद नं. ६

ता. ९-२-२४ रोजीं ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टाचे नाझर यांनीं ट्रस्टींचे

वकील श्रीयुत धुरंदर यांना यादी लिहून अण्णाची सर्व स्थावरजंगम मिळकत श्रीयुत धुरंधर यांचे ताब्यात दिली. धुरंधर यानीं तीच यादी व चार वर्षांचे अवधींत कोर्टाकडे आलेले स्थावरजंगम मिळकतीचे उत्पन्न, इतर हक्काचे उत्पन्न, त्यांतून कोर्टाने केलेला खर्च वजा घालून बाकी राहिलेली शिल्लक याचें एक टिपण असे दोन कागद श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे श्रीयुत देव यांचे मार्फत ता. १४-३-२४ रोजीं पाठविले.

**१ उत्पन्नांतून खर्च वजा जातां अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे कोर्टांतून आलेली शिल्लक, २ वेढयाच्या जमीनीचें उत्पन्न, ३ अण्णाच्या हक्काचा तपास, ४ धुरंधर यांचें पत्र कागद नं. ७**

श्रीयुत धुरंधर यांजकडून अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे जे टिपण ( कागद नं. ६ ) आले त्यावरून असें नजरेस आलें कीं, डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे, ते कोर्ट व्यवस्था पाहात असलेल्या मुदतींत फक्त चिंचवणी व नेवाळे या दोनच गांवच्या जमीनीचा वसूल येत असे. वेढयाच्या जमिनींचें उत्पन्न मुळींच येत नसे. तसेंच तें कोर्ट फक्त चिंचणी व नेवाळे याच जमीनीचा धारा भरीत असे. वेढयाच्या जमीनीचा धारा भरीत नसे.

चिंचगा जमीनीचा सरकार धारा दरसाल १३-७-६ असून नेवाळे जमीनींचा रु. १०१ आहे.

कोर्टाचे ताब्यांत हीं मिळकत चार वर्षें असलेल्या मुदतींत धारा वजा जातां ( धारा वजा करूनच तलाठी बाकीचे उत्पन्न कोर्टाकडे पाठवीत असत ) कोर्टाकडे खालीं लिहिल्याप्रमाणें एकंदर उत्पन्न जमा झाले आहे.

| रु. आ. पै | |
|---|---|
| ३१०२--४--२ | दोन गांवच्या जमीनीचे उत्पन्न |
| ६७८--०--९ | जंगम माल विक्रीचे उत्पन्न |
| ७९--३--० | बद्दलचे उत्पन्न |
| ३८५९--७--११ | |

त्याचप्रमाणे त्याच अवधींत कोर्टानें खर्च केला तो खालीं लिहिल्याप्रमाणें:

| | |
|---|---|
| १२०९--२--६ | मनोरलाल दास यानें दिलेल्या व्याजाच्या पहिले दरखास्तीची रक्कम |
| १२८०--४--० | आत्माराम अनंत बाबरे यांचें देणे |
| ५९०--०--३ | नाझरचीं कमीशने व प्रवास खर्च |
| ३२९-१०-९ | श्रीयुत धुरंधर यांचे कमीशन व इतर खर्च |
| ३४०९--१--६ | |

उत्पन्नांतून खर्च वजा जातां बाकी शिल्लक रु. ४५०--६--५ राहाते हे दोन कागद आल्यानंतर श्रीयुत धुरंधर यांजकडून ता. १०-४-२४ रोजीं जी इंग्रजी यादी श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर याना आली आहे त्यात आपलेकडे रु. ४५१--९--१० बाकी आहे असे त्यांनीं लिहिले आहे. व ता. ११-४-२४ रोजीं रु. २०० व ता. २३--४--२४ रोजीं रुपये २५० मिळून रु. ४५० श्रीयुत अण्णासाहेब यांजकडे त्यानीं पाठविले आहेत. या तफावतीबद्दल श्रीयुत धुरंधर यांस खुलासा करणेस विचारिले आहे.

या ४५० रुपयांतून अण्णासाहेबांनीं नेवाळे जमीनीचा धारा रु. १० माहीम मामलेदार यांजकडे ता. २१--४--२४ रोजीं पाठविला आहे.

वर जी ७९-३-० अण्णाचे हक्काची रक्कम जमा झाली आहे ती कोणते हक्काची, दरसालची किंवा फक्त त्याच साळची याबद्दल श्रीयुत धुरंधर यांनीं पाठविलेल्या नं. ६ चे कागदांत खुलासा नाहीं. त्याबद्दलचा तपास धुरंधर-जवळ व श्रीयुत अण्णासाहेब खरे यांजकडे केला; परंतु त्याचा उलगडा कोणा-कडूनही झाला नाहीं. आतां श्री. अण्णासाहेब करदीकर यांस त्याबद्दल डहाणू कोर्टांत तपास करण्यास सांगितलें आहे.

## चिंचणी व नेवाळें येथील जमीनीच्या उत्पन्नाच्या वसुलाची व्यवस्था.

### नेवाळें गवती जमीनींतील इंजायली झाडोरा विक्री नं. १७

श्रीयुत धुरंधर यांचे यादीवरून ( कागद न. ५ ) जरी ट्रस्टींचे ताब्यांत मिळकत आली तरी ही मिळकत चिंचणी, नेवाळे व वेढे या गांवीं कोणकोणत्या ठिकाणीं आहे, त्या जमिनीचा धारा किती, त्या जमिनीची लागवड करणारीं कुळें कोण, त्या कुळाकडून किती मक्ता येतो, या जमिनींत भातजमीन ( खरीप ) किती, गवती ( वरकस ) किती, एकंदर भाताचें उत्पन्न येते किती, गवताचे उत्पन्न येते किती, वगैरे माहिती ट्रस्टींना नसल्यामुळें श्री. कै. काका-साहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर व देव हे श्रीयुत अण्णासाहेब खरे यांना मल्याण येथे श्री. अण्णासाहेब ( जनुभाऊ ) करंदीकर यांचे घरीं भेटले; व त्यांना वरील सर्व माहिती विचारली. ही सर्व माहिती कै. श्रीयुत पंढरीनाथ आत्माराम बावरे याना आहे व त्यांनींच या जमीनीचे सन १९२३-२४ सालचें उत्पन्न वसूल केलें आहे असें त्यांनींच सागितले. या वेळीं पंढरीनाथही तेथे हजर होते. नंतर सन १९२४-२५ सालचेही उत्पन्न पंढरीनाथ यांनाच वसूल करण्यास सांगावे असे सर्वांनुमते ठरलें. पंढरीनाथ यानीं ही गोष्ट कबूल केली. नतर ठरल्याप्रमाणे पंढरीनाथ यांनीं कुळाकडून व गवताचे व्यापा-ऱ्यांकडून वसूल केला. परंतु वसूल केलेली सर्व रक्कम श्रीयुत अण्णासाहेब खरे याजकडे भरली नाहीं. काहीं भरली व कांहीं त्याचेकडे व कांहीं कुळांकडे बाकी राहिली. तसेंच नेवाळें गांवच्या गवती जमीनींतील बाभळी व इंजायली

झाडोऱ्याच्या विक्रीचे रुपये २५१ बाणगावचे लोहारापासून वसूल करून तेही पैसे अण्णासाहेब खरे याजकडे भरले नाहींत.

## नेवाळें व चिंचणीची जमीन, घर व बेडें ट्रस्टींनीं प्रत्यक्ष पाहिलें. मोरूचा करार कागद नं. ८, सुकट्याचा करार कागद नं. ९.

ता. १५–६–२४ रोजीं कै. श्रीयुत काकासाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर व देव हे शेट नरसीलाल हरीलाल व इतर माहितगार मंडळीस बाणगांवाहून बरोबर घेऊन प्रथम नेवाळे गांवचे जमीनीवर गेले. लागवड करणाऱ्या सर्व कुळाच्या त्यांनीं गांठी घेतल्या. सर्व खरीप वरकस जमीन पाहिली. नंतर तेथून निघून ही सर्व मंडळी चिंचणीस गेली. एक दिवस तेथे मुक्काम करून अण्णाची भातजमीन, अण्णाची वाडी, अण्णाचे घराची जागा व अण्णाचें बेडे वगैरे ठिकाणे त्यांनीं पाहिलीं. त्या वेळीं अण्णाचे घर जाग्यावर मुळींच नव्हतें व बेडे मोडले होते असे नजरेस आले. मोरु पदमण याने वाडी मागितली. ती सर्वानुमते त्यास दरसाल २० रु. कराराने दिली व शेट नरसीलाल यांना बेडें विकण्याकरिता व मोरु पदमणचा व भातजमीन लागवड करणारा सुकट्या लक्ष्मण याचा २॥ खंडी खंडाचा दरसालचा करार लिहून घेण्यास सांगितले. अर्धे साल गेलें असल्यामुळे आपण त्या सालचे फक्त १० दहाच रुपये देऊं असे मोरु पदमणने सांगितल्यावरून त्या सालचे दहा रुपयेच घेण्याचें सर्वानुमते ठरलें. शेट नरसीलाल यांनीं त्याप्रमाणे मोरु पदमणचा व सुकट्या लक्ष्मणाचा लेखी करार ता. रोजीं लिहून घेऊन ते दोन्ही करार श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांचेकडे वांद्रे मुक्कामी पाठवून दिले.

## मोबेटच्या स्टँपाकरितां घेतलेली रक्कम कोठी कीर्दीस परत जमा

श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांनीं शिरडी संस्थान कोठी कीर्दींतून स्टँपाकरता उसनवार घेतलेली ३०० रुपयांची रक्कम श्रीयुत धुरंधरकडून

आलेल्या ४५० रुपयांतून घेऊन परत कोठी कीर्दीस ता. २०--८--२४ रोजीं जमा केली.

## १५. सरकार कागदीं ट्रस्टींचीं नांवें खात्याचे व रेकॉर्ड ऑफ् राइट्सचे उतारे. कागद नं. १०, ११, १२, १३ व १४

तारीख ६--९--१९२४ चा मामलतदार माहीम याचा हुकूम गांव कामगारांस गेल्यावरून तलाठी नेवाळे व वेढे यांनीं नेवाळे व वेढे येथील जमीनीस अण्णाचे जागीं कबजेदार म्हणून सर्व ट्रस्टींचीं नांवें गावचे सरकार कागदीं दाखल केलीं. त्याच सुमारास डहाणू मामलतदार यांचे हुकुमाने चिंचणीचे जमिनीसही चिंचणीचे तलाठीकडून अण्णाचे जागीं सरकार कागदीं सर्व ट्रस्टींचीं नांवें दाखल करण्यांत आलीं. नंतर श्रीयुत अण्णासाहेब खरे यानीं ट्रस्टींचीं नांवें दाखल झालेल्या नेवाळे व चिंचणी गावचे जमिनीचे उतारे मागितले व ते तलाठीकडून आल्यावर श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यानीं श्रीयुत आपासाहेब करंदीकर यांचे मार्फत वेढे गांवच्या जमिनीचे जुने व नवे रेकॉर्ड ऑफ राइट्सचे म्हणजे गावचा नमुना नंबर सात व बाराचे उतारे मागितले. तलाठीकडून हे उतारे मिळाल्यानंतर आपासाहेबांनीं ते अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविले.

## १६. अण्णाचें अजमासी कर्ज

श्रीयुत कृष्णलाल मनोरदास राहाणार चिंचणी यांच्या सन १९१७ सालीं अण्णाविरुद्ध डहाणू कोर्टांत झालेल्या हुकूमनाम्यावरून, ट्रस्टींनीं प्रोबेट मिळण्याकरतां ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांत सन १९२१ सालीं केलेल्या अर्जावरून डिस्ट्रिक्ट कोर्टांकडून श्रीयुत धुरंधर वकील याचे मार्फत ट्रस्टीकडे आलेल्या नोटीसवरून, व श्री. कै. काकासाहेब दीक्षित यांजकडे श्रीयुत नरोत्तम केशव यांना त्यांच्या अण्णाविरुद्ध झालेल्या हुकूमनाम्याच्या भरपाईकरतां श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांचे कोठी कीर्दीतून ता. ३०--४--२६ रोजीं उसनवार घेऊन

त्याच दिवशीं पाठविलेल्या ८० रुपयांच्या रकमेवरून श्रीयुत कै. काकासाहेब दीक्षित व अण्णासाहेब दाभोळकर याना अण्णास रु. ५८८० देणे होतें असें आढळून आलें. परंतु हा आंकडा निवळ अजमासाचा होता. या आकड्यात व वरील पांचही सावकारांस जी व्याज मुदलासह प्रत्यक्ष पोंच झाली आहे त्यांत फार तफावत आहे. कृष्णलालचे व्याजाची रक्कम किती भयंकर फुगलेली होती याची कोणास कल्पनाच नव्हती.

**कर्जः—कृष्णलालचा हुकुमनामा नंबर १५, ट्रस्टीचा अर्ज नं. ३ कोर्टाकडील यादी नं. ६, श्री. खरे यांची यादी नं. १६ व १७, मिळकतीच्या चोपड्यांतील कोठी कीर्दींचा जमाखर्च नं. १८, १९, २०**

अण्णाच्या व्याजासह वास्तविक देण्याची रक्कम खालीं लिहिल्याप्रमाणें-

रु. आ. पै

८३७०—१—९ पांच सावकाराचे व्याजमुदलासह देणें.

४००९—३—० श्रीयुत कृष्णलाल याचे हुकुमनाम्याची खर्चासह रक्कम. दरसाल ४०० रुपयांचा हप्ता द्यावयाचा व सर्व रक्कम फिटेपर्यंत दरसाल दर शेकडा ६ रु. प्रमाणे व्याज द्यावयाचे असा कोर्टाचा ठराव. अण्णानें आपले हयातींत कृष्णलाल अगर दुसरे बाकीचे सावकारास व्याजाची अगर मुदलाची एक पैही दिली नाहीं. कृष्णलालचें व्याजासह देणे १९२७ सालांत फिटलें.